भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र

(दुपार )

जा.क्र. ८२/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक ०२/०२/२०१७

**१) अज्ञात वाहन चालकांच्या निष्काळजीपणामुळे, एक जखमी . :—**

दिनांक २२/०१/२०१७ चे १४.३० वा. दरम्यान यातील जखमी पवन जियालाल मलेवार वय २१ वर्ष रा. गौतम वार्ड तुमसर हा आपले हिरो पॅशन प्रो मोटार सायकल क्र. एमएच ३६ आर ५१९० नी सितेपार कडून डोंगरला मार्गे तुमसर कडे येत असता विरुध्द दिशेने येणाऱ्या यातील आरोपी अज्ञात वाहन चालकाने आपल्या ताब्यातील वाहन भरधाव वेगाने निष्काळजीपणे व हयगयीने चालवुन जखमीचे मोटार सायकल ला धडक मारुन गंभीर जखमी करुन अपघाताची सुचना न देता पळुन गेल्याने चौकशी अहवाल व डॉ. रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन तुमसर येथे कलम २७९,३३७,३३८ भादवी. सहकलम १३४/१८७,१८४ मोवाका अन्वये येथे गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. कळंबे पोलीस स्टेशन तुमसर हे करीत आहेत.

**२) ट्रॅक्स चालकांच्या निष्काळजीपणामुळे वाहन पलटी होवुन महीलेस व इतर प्रवासी जखमी करण्यास कारणीभुत झाल्याने गुन्हा नोंद . :—**

दिनांक ०४/०१/२०१७ चे २०.२० वा. दरम्यान यातील फिर्यादी खुशाल मंगलु धार्मीक वय ६६ वर्ष, रा. सानगडी यांची पत्नी सौ. सुमन खुशाल धार्मीक वय ६० वर्ष, ही ट्रॅक्स क्र. एमएच ३५/२६२४ ने पवनी वरुन सानगडी येथे जात असतांना यातील आरोपी चालकाने आपल्या ताब्यातील वाहन हयगयीने व निष्काळजीपणे चालवुन खराशी ते दिघोरी डांबरी रोडवर वाहन पलटी होवुन फिर्यादीची पत्नी व इतर प्रवासी यांना जखमी करण्यास कारणीभुत झाल्याने फिर्यादीचे बयान व डॉ. रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन पालांदुर येथे कलम २७९,३३७,३३८ भादवी. अन्वये येथे गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास मपोशि. चाचेरे पोलीस स्टेशन पालांदुर हे करीत आहेत.

**३) मोटार वाहन कायदयाखाली कारवाई. :—**

दिनांक ०१/०२/२०१७ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी मोटार वाहन कायदयाखाली ७८ प्रकरणांची नोंद करण्यात आलेली असून त्यापैकी तीन सिटर वाहनांवरती १७ केसेस व तसेच ईतर वाहनांवरती ६१ केसेस करण्यात आलेल्या आहेत.

(बी. आर. गाडे)
प्रभारी पोलीस उपअधिक्षक(गृह)
भंडारा
दुरध्वनी.क्र. ८८०५१०१११२

प्रति,

**जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा**

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

**प्रत, संगणक कक्ष,** भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.